स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या या शाखेअंतर्गम इतिहास
विषयातील पी.एच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा
स्थूल आराखडा

शीर्षक

लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे : एक अभ्यास

संशोधक

आल्टे मनिषा रामा

(एम.ए.,बी.एड्.सेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजकुमार संतराम कांबळे

(सहाय्यक प्राध्यापक ,श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय,लातूर)

संशोधक केंद्र

इतिहास विभाग,

हुतात्मा गोविंदराव पानसरे महाविद्यालय,अर्जापूर, ता.बिलोली,जि.नांदेड

नोव्हेंबर २०१९

लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे : एक अभ्यास

प्राचीन काळापासूनच मानवाला प्रवास म्हणजेच पर्यटन करण्याची आवड निर्माण झालेली आहे. आज वाहतूकीच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती झाल्यामुळे पर्यटन सुव्यवस्थित, सुलभ आणि आनंददायी झाली आहे. त्यामुळे आज २१ व्या शतकात पर्यटन व्यवसायास महत्व प्राप्त झालेले आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या दृष्टीकोनातून पर्यटन महत्वाचे मानले गेले. परंतू काळाच्या ओघात पर्यटनाची व्याप्ती वरील घटकांपुरतीच मर्यादित न राहता आज ती वाढलेली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन व्यवसायाचे महत्व ओळखून अनेक देशांनी पर्यटन व्यवसायाच्या विकासाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे आज पर्यटन व्यवसाय विकसीत होत आहे.

प्राचीन काळी भारतीय समाजात पर्यटन, अस्तित्वात होते. भारतात सिंधू संस्कृतीपासून व्यापार, धर्म, संस्कृती, तत्वज्ञान इत्यादी अनेक कारणांनी पर्यटन झाले आहे. मौर्यकालखंडात मॅगेस्थेनिस हा प्रवासी भारतात आला. सम्राट अशोकाने बौध्द भिक्खूंना भारतातील विविध भागात आणि भारताच्या शेजारील देशात बौध्दधर्माच्या प्रसारासाठी पाठविले होते. भारतीय धर्म, संस्कृती, शिक्षण, कला, यांच्या अभ्यासासाठी अनेक परकीय पर्यटकांनी भारतात प्रवास केला. त्यामध्ये फाहियान, ह्यु-एन-त्संग, इत्सिंग व अल्बेरूनी इ.ची नावे सांगता येतील. भारतीय पर्यटनात प्राचीन काळापासून धार्मीक पर्यटनाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण धार्मीक स्थळांना भेटी दिल्याने आत्मिक शांती प्राप्त होते. अशी भारतीयांची भावना आहे. धार्मीक स्थळांच्या ठिकाणी गेल्याने मोक्ष प्राप्ती होते. जीवनाचे साफल्य होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात भारतात धार्मीक पर्यटन केले जाते. भारतात धार्मिक स्थळांची संख्या भरपूर आहे. हीच धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. पंढरपूर, शिर्डी, काशी, तुळजापूर, माहूर, नागपूर, सांची, सारनाथ, नाशिक, तिरूपती, रामेश्वर, हरिद्वार, मदुराई, ऋषिकेश, अलाहाबाद, अयोध्या, मथूरा, नांदेड, कुंथलगिरी, अजिंठा, वेरूळ, शिखर शिंगणापूर व कोल्हापूर हे पवित्र धार्मिक पर्यटन स्थळे लाखोंच्या संख्येने येणा-या यात्रेकरुंनी सतत गजबजलेली असतात. यात्रा व उत्सवांच्या निमित्ताने हजारो यात्रेकरू पर्यटक येथे येतात. म्हणून

धार्मिक पर्यटन स्थळांना पर्यटनात महत्व आहे.

नैसर्गिक सौंदर्याची देणगी असलेल्या महाराष्ट्र राज्याला जवळपास ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. सह्याद्रीसारख्या उंच पर्वतरांगा या राज्यात असून या पर्वतरांगातून गोदावरी, कृष्णा आणि कावेरी यासारख्या नद्या उगम पावतात. एकूणच पर्यटनाच्या दृष्टीने राज्याला नैसर्गिक वारसा लाभला असून पर्यटकांना आकर्षित करणा-या अनेक ऐतिहासिक वास्तू आणि प्राचीन स्मारके राज्यात आहेत. इतकेच नाहीतर महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा यासारखी थंड हवेची ठिकाणे आहेत. विविध नैसर्गिक धबधबे असून राज्यातील व्याघ्र प्रकल्प (ताडोबा) अभयारण्य (माळढोक) इत्यादी स्वदेशी पर्यटकांबरोबर विदेशी पर्यटकांचे आकर्षणाची ठिकाणे आहेत. महाराष्ट्रातील रायगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग, पन्हाळा, सिंहगड, यासारखे अनेक दूर्ग, अजिंठा, वेरूळ, कार्ले, भाजे, एलिफन्टा (घारापूरी) यासारखी प्राचीन लेणी आहेत. पशूपक्षी (वाघ, माळढोक, हरिण, गवे) यासारखे प्राणी, जायकवाडी, कोयना, राधानगरी, उजनी यासारखी धरणे व अनेक उद्याने आहेत. हे पहाण्यासाठी पर्यटक येतात नांदेड शिर्डी, पंढरपूरख शेगाव, कोल्हापूर, तुळजापू गणपतीपुळे, भिमाशंकर, नाशिक ही धार्मिक स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात. एकूणच सर्व घटकांमुळे राज्यातील पर्यटन विकसीत होत आहेत.

महाराष्ट्रात पर्यटनाच्या दृष्टीकोनातून लातूर जिल्ह्याला महत्वाचे स्थान आहे. लातूर जिल्ह्यास मौर्य कालखंडापासूनची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. लातूर जिल्ह्याच्या भूप्रदेशाचा मौर्य, सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, यादव, बहामनी, निजामशाही, आदिलशाही, मोगलशाही, मराठे या सत्तांशी संबंध आलेला आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याची ऐतिहासिकता समृध्दा झालेली आहे. यातून येथे धार्मिक संक्रमण मोठ्या प्रमाणावर झाले याचा परिणाम म्हणून या भूप्रदेशावर हिंदू, जैन, बौध्द, ख्रिश्चन, इस्लाम इ. धार्मिक स्थळे आहेत.

यामुळे आज ही लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांवर वारकरी संप्रदाय, भक्ती चळवळ, शैव संप्रदाय, वैष्णव संप्रदाय, बौध्द पंथ इ. च्या तत्वज्ञानाचे गुण, वैशिष्ट्यांचा प्रभाव टिकून आहे. लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे पर्यटनासाठी महत्वाची असल्याने भारतातून आज महाराष्ट्रातून लाखोंच्या संख्येने पर्यटक येत आहेत. लातूर शहराचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिर, रत्नेश्वर मंदिर,

जगदंबादेवीचे मंदिर, अष्टविनायक मंदिर, रेणापूरचे रेणूकादेवीचे मंदिर, चाकूरचे श्रीकृष्ण सत्यसाई धाम, निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिर यांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या समवेत लातूर जिल्ह्यातच उदगीरचे - सोमनाथ मंदिर, अंबाबई मंदिर, औसाचे -वीरनाथ - मल्लिनाथ मंदिर, किल्लारीचे - निलकंठेश्वर मंदिर, चिंचोली बल्लाळनाथचे - भैरवनाथाचे मंदिर, पानगावचे - विठ्ठल मंदिर, तळीखेडचे - शिवमंदिर, वडवळचे - नागनाथ मंदिर, शिरुर अनंतपाळचे - अनंतपाळ मंदिर, लातूरचे पापविनाश, भूतेश्वर मंदिर, केशवराज मंदिर, बुध्द विहार, मुस्लिम प्राथर्ना स्थळे - हजरत सुरतशहावलीचा दर्गा, जैन धर्मीय प्रार्थना स्थळे - पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर अशी अनेक पर्यटन स्थळे लातूर जिल्ह्यात आहेत. या धार्मिक स्थळांमुळे लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनात वाढ होऊन याचा परिणाम लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर होत आहे. सोबतच भारतीय संस्कृती, स्थापत्य, कला, शिल्पकला, तत्वज्ञान, मुर्तीकला यांच्या संवर्धणासाठी ही धार्मिक स्थळे कारणीभूत ठरत आहेत.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

लातूर जिल्यातील धार्मिक पर्यटनाची माहिती समाज व वाचक यांच्यापुढे यावी हा प्रस्तुत शोधप्रबंधाचा उद्देश आहे. प्रबंधाची उद्दिष्ट्ये पुढिलप्रमाणे आहेत.

१) लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.

२) लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाची ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करणे.

३) लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

४) लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनांचा येथील आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे.

५) लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव अधोरेखित करणे.

संशोधनाची गृहितके :-

संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे आहेत.

१) लातूर जिल्ह्यास धार्मिक वारसा लाभलेला आहे.

२) लातूर जिल्ह्यात विविध धर्मांची धार्मिक स्थळे आहेत.

३) लातूर जिल्ह्याच्या सांस्कृतिक विकासात धार्मिक स्थळांचा प्रभाव आहे.

४) लातूर जिल्ह्याच्या सामाजिक जीवनावर धार्मिक तीर्थस्थळांचा प्रभाव आहे.

५) लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे पर्यटन क्षेत्र म्हणून मान्यता प्राप्त आहेत.

६) लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळामधून येथील शिल्पकला, मूर्तीकला, मंदिरकला इत्यादी माहिती मिळते.

व्याप्ती व महत्व :-

सदरचे संशोधन हे लातूर जिल्ह्याशी संबंधित असून संशोधनात लातूर जिल्ह्यातील असलेल्या धार्मिक स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येईल. लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचे धार्मिक व सामाजिक जीवनातील महत्व त्याचबरोबर या स्थळांचा जिल्ह्यातील आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे. लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांची स्थापत्य कला, मूर्तीकला, त्याचबरोबर त्या ठिकाणी साजरे केले जाणारे सण, उत्सव, यात्रा यांचा अभ्यास करण्यात येईल. हे संशोधनाचे महत्व आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तूत संशोधनाचा हेतू साध्य करण्यासाठी खाली दिलेली गृहितके सिध्द करण्यासाठी येथे ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. विशेषत: लिखित व अलिखित साधनाचाही आधार संशोधनासाठी घेण्यात येईल. तसेच सर्वेक्षण पध्दती, निरिक्षण पध्दती, मुलाखत पध्दती याचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

माहिती संकलन :-

प्रस्तुत संशोधनात या अभ्यास विषयाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात येईल. महाराष्ट्र राज्याचे गॅझेटिअर तसेच लातूर जिल्ह्याचे गॅझेटिअर, प्रत्यक्ष मुलाखतीतून मिळालेली माहिती, तीर्थक्षेत्रावर आढळलेले शिलालेख, मंदिरे, मुर्त्या, तीर्थक्षेत्राच्या संस्थेकडे असलेली कागदपत्रे याच्या आधारे माहिती मिळविली जाईल. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी प्रकाशित केलेली पुस्तके, साहित्य, अहवाल, लेख, चरित्रे, तीर्थक्षेत्राविषयी असलेली सामाजिक दंतकथा,

अख्यायिका इत्यादीच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात येईल.

माहिती विश्लेषण :-

प्रस्तूत संशोधनासाठी वरील सूचवण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचा वापर करून जी माहिती संकलित करण्यात येईल त्या माहितीच्या आधारानेच संबंधित विषयाचे विश्लेषण करण्यात येईल.

संकलित प्रबंधाची प्रकरण विभागणी

प्रकरण पहिले	:-	प्रास्ताविक
प्रकरण दूसरे	:-	पर्यटन संकल्पना व स्वरूप
प्रकरण तिसरे	:-	लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे
प्रकरण चौथे	:-	धर्मिक पर्यटनाचा लातूर जिल्ह्यावर झालेला परिणाम
प्रकरणच पाचवे	:-	उपसंहार

प्रकरण पहिले

प्रास्ताविक

लातूरची भौगोलिक परिस्थिती :-

महाराष्ट्रामधील एक महत्वपूर्ण जिल्हा म्हणून लातूरचे महत्व आहे. लातूर जिल्हा हा मराठवाडा विभागातील एक असून तो १७° ५२' ते १८°५०' उत्तर अक्षांश ते ७६°१८' ते ७९°१२' पूर्व रेखांशात पसरलेला आहे. लातूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७.१७५ चौ.कि.मी. आहे. लातूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार २०,८०,२८५ इतकी होती. लातूर जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्य ८६१.७ मि.मी. इतके असते. लातूर जिल्ह्याच्या उत्तरेस परभणी जिल्हा, ईशान्येस नांदेड जिल्हा, पूर्व व आग्नेयस कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा, दक्षिणेस व पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा तर वायव्येस बीड जिल्हा आहे. या जिल्ह्याने राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २.३३ टक्के इतका अल्प भाग व्यापला आहे. औरंगाबाद विभागातील क्षेत्रफळापैकी ११.३४ टक्के क्षेत्र लातूर जिल्ह्याचे आहे. जिल्ह्याच्या पश्चिम व मध्य भाग बालाघाट डोंगरांच्या रांगांनी व्यापलेला आहे. जिल्ह्याच्या मध्यभागी मांजरेचे खोरे तर दक्षिणेकडे तेरणा खोरे पसरलेले आहे. उत्तरेकडील प्रदेश सखल व सपाट आहे. या जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे सौम्य व कोरडे आहे. तसेच उन्हाळयात कमाल तापमान सहसा ४०° सेल्सिअस पर्यंत असते. जिल्ह्यातून मांजरा, तेरणा, मन्याड, घरणी, लेंडी, तावरजा नदीवर धरणे बांधण्यात आली आहेत. १ मे १९६० रोजी सध्याचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर लातूर हा प्रदेश उस्मानाबाद जिल्ह्यांतर्गत महाराष्ट्र राज्याचा घटक बनला. १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती केली गेली.

अशा पध्दतीने लातूर जिल्याची भौगोलिक तसेच राजकीय व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दूसरे

पर्यटन संकल्पना व स्वरूप

प्रस्तावना :-

प्रवास ही प्राचीन काळापासून चालत आलेली क्रिया आहे. प्रारंभापासून मानवाला प्रवासाची आवड आणि आकर्षन आहे. एकविसाव्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूरगामी परिणाम करणारी आर्थिक क्रिया म्हणजे पर्यटन होय. अनादी काळापासून मानवाचा प्रवास सुरू असून अनभिज्ञ ठिकाणाचा ठाव घेण्याची ईर्ष्या व प्रवास यांनी मानवी मनास मोहित केलेले आहे. प्राचीन मानव कोणताही उद्देश न बाळगता अगदी साधेपनाने प्रवास करीत असे. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेला मानव आवड, कुतुहल व संशोधन म्हणून प्रवास करतो. पर्यटनामुळे देशाला परकीय चलन प्राप्त होते. भिन्न विभिन्न समाजातीला देशातील लोकांचा संपर्क पर्यटनामुळे निर्माण होतो. राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी वैचारिक देवाण-घेवाण पर्यटनामुळे होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढण्यासाठी मदत होते.

पर्यटन म्हणजे काय :-

आज जगात पर्यटनाला महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन या शब्दास इंग्रजीत Tourism असे म्हणतात. Tourism हा शब्द Tour या शब्दापासून व Tour हा शब्द लॅटिन भाषेतील Tornos या शब्दापासून तयार झालेला आहे. Tornos या शब्दाचे रूपांतर पुढे Tourism या शब्दात झाले. Tourism या शब्दाचा अर्थ Journey म्हणजे प्रवास असा होतो. हा प्रवास जागेचा शोध घेणे, शिक्षण घेणे, अभ्यास करणे, व्यवसाय आणि आनंद प्राप्तीसाठी होत असतो. यामध्ये मानवाने ज्याविषयी ऐकले आहे. ते पहाण्याची इच्छा अंतर्भूत असते.

पर्यटनाच्या व्याख्या :-

अनेक अभ्यासकांनी पर्यटनाच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) जोस ॲरिलागा :-

“ सायकलवरून भ्रमंती करणे, गिर्यारोहण करणे किंवा शहरात एखाद्या ठिकाणी तळ ठोकणे, नौकाविहार करणे (मुक्त विहार) व अनेक खेळ खेळणे यासाठी भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय.”

२) हरमन श्युल्लर्ड :-

इ.स. १९१० मध्ये या ऑस्ट्रेलियन अर्थतज्ज्ञाने पर्यटनाची व्याख्या करताना म्हटले की, ''परदेशातून एखाद्या मानवाने एखाद्या देशात, प्रदेशात किंवा शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती व तिथून पुन्हा स्वदेशी जाणे म्हणजे पर्यटन होय.''

३) डॉ. जेभिड्डिन :

पर्यटन हे एक सामाजिक आंदोलन असून त्यामध्ये आराम, विनोद, क्रीडा व सांस्कृतिक गरजांची पूर्तता होते.

अशा विविध व्याख्या पर्यटनासंबधी केलेल्या आहेत. त्याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

तसेच पर्यटनाची ऐतिहासिकता, पर्यटकांची उद्दिष्ट्ये, पर्यटनाचे स्वरूप, पर्यटनाची व्याप्ती, पर्यटन विकास, पर्यटनात इतिहासची भूमिका, शासन आणि पर्यटन या घटकांचा अभ्यास या संबंधी प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे

लातूर जिल्हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा असून तो राज्याच्या दक्षिणपूर्व दिशेस (आग्नेय महाराष्ट्रात) आहे. धार्मिक व अध्यात्मिक दृष्टीकोनातून लातूर जिल्हा राज्यात महत्वाचा ठरतो. जिल्ह्यात रेणापूर, औसा, उदगीर, निलंगा, लातूर, अहमदपूर इत्यादी ठिकाणांची देवस्थाने प्रसिध्द आहेत. त्यांचा अभ्यास या प्रकरणात खालीलप्रमाणे करण्यात येईल.

१) सिध्देश्वर मंदिर : लातूर

लातूरमधील प्राचीन मंदिरामध्ये सिध्देश्वर मंदिराची गणना होते. हे भव्य दगडी मंदिर पश्चिमाभूख आहे. या मंदिरात बाराव्या शतकातील शिलालेख आहेत. हे लातूर जिल्ह्यातील हे सर्वात भव्य मंदिर आहे. सिध्देश्वर हे लातूरचे ग्रामदैवत आहे. हे मंदिर पुरणाकालीन राजा ताम्रध्वज याच्या काळात बांधल्याचे सांगितले जाते. या मंदिराचा उल्लेख रत्नापूर माहात्म्य या पोथीतही आहे. हे देवस्थान त्यांच्या महात्म्यावरून त्याच्या जवळील पंचक्रोशीत प्रसिध्द झालेले

होते. व आज तर या ठिकाणाला नावलौकिक मिळालेला आहे. या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रात भाविक देवदर्शनासाठी येतात. मंदिरातील गाभा-यात शिवलिंग आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला या मंदिरात यात्रा भरते. सुरूवातीला यात्रा ५ ते ७ दिवस चालत असे परंतू आता १५ दिवस यात्रा भरते. या यात्रेच्या दिवसात सुमारे दहा लाख भाविक यात्रेस भेट देतात. या यात्रेत मोठी व्यापारी उलाढाल होते. कुस्तीस्पर्धाही होतात. कुस्तीस्पर्धेतील विजेत्यास रोख पारितोषकासह चांदीचा गदा व " सिध्देश्वर केसरी " हा किताब बहाल केला जातो. यात्रेसाठी संपूर्ण जिल्ह्यातून राज्य परिवहन महामंडळाच्या जादा गाड्या सोडण्यात येतात.

२) रेणुकादेवी मंदिर : रेणापूर

मूळ बीड जिल्ह्यातील या शहराचा समावेश जिल्हा पुनर्रचने अंतर्गत आता लातूर जिल्ह्यात करण्यात आला आहे. या शहरात रेणुकादेवीचे प्राचीन हेमाडपंती मंदिर आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर दोन दगडी दीपमाळा आहेत. त्यातील उजव्या बाजूच्या दीपमाळेस धक्का दिल्यास ती हालते. या दिपमाळेस शीर्षापर्यंत जाण्यासाठी जिना आहे. या मंदिराच्या गाभा-यात एका पीठावर रेणुकादेवीचा तांदळा आहे. या देवीवर स्थानिक रहिवाशांची अपार श्रध्दा आहे. वैशाख पोर्णिमेस येथे तीन दिवस जत्रा भरते. नवरात्र उत्सवामध्ये अनेक श्रध्दाळू भाविक रेणुकादेवीच्या दर्शनासाठी येतात.

३) नीलकंठेश्वर मंदिर : निलंगा

तेरणा नदीच्या उत्तर किना-यावर वसलेले हे शहर हेमाडपंती प्रकारातील नीलकंठेश्वर मंदिरासाठी परिचित आहे. खरोसा शैलगृहांपासून उत्तरेस हे २५ कि.मी. अंतरावर आहे. या भविष्योत्तर पुरणांतर्गत "नीलकंठेश्वर महात्म्य" नामक १० अध्याय व ५३४ श्लोकांची पोथी आहे. त्यात या नगरासंबंधी दंतकथा आहे. गर्भगृहात शिवलिंग आहे. मुख्य गर्भगृह व दोन उपगर्भगृहे असलेल्या नीलकंठेश्वर या त्रिकुटेश्वर मंदिराचा निर्माणकाळ कल्याणीच्या चालुक्य काळातील १२ व्या शतकातील असावा. रामलिंग-मुदगड येथील शिलालेखावरून नरवैद्य नारायण भट्टाने हे मंदिर चालुक्य काळात बांधले असावे. या मंदिरात अत्यंत रेखीव आणि कल्पनारम्य शिल्प आहे. हे शिल्प येणा-या पर्यटकाचे लक्ष वेधून घेतात.

४) विठ्ठल मंदिर : पानगाव

महाराष्ट्रातील इतर अनेक मंदिरापैकी लातूर जिल्ह्यातील पानगाव येथील विठ्ठल मंदिर हे एक अप्रतिम मंदिर आहे. लातूर जिल्ह्याच्या ईशान्येय ४० कि.मी. अंतरावरील गावात मध्ययुगीन मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ठ नमुना विठ्ठल मंदिराच्या स्वरूपात सापडतो. गावाच्या मध्यभागी असलेले हे अप्रतिम आणि भव्य असे मंदिर आजही चांगल्या अवस्थेत आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. हे मंदिर ११ व्या शतकात बांधले गेले असावे. या मंदिरात मुर्तीशिल्पही आहेत. या मंदिराची बरीचशी वैशिष्ट्ये होट्टल येथील सिध्देश्वर मंदिर आणि धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिराच्या वैशष्ट्यांशी मिळतीजुळती आहेत.

५) नागनाथ मंदिर : वडवळ

वडवळ - नागनाथ या नावाने ओळखल्या जाणा-या या एका स्वतंत्र वसाहतीत यादवकाळात बांधण्यात आलेल्या हेमाडपंती पध्दतीचे शिवमंदीर आहे. मंदिराचे मुळ स्वरूप अस्तित्वात नसले तरी पाताळ-लिंगी गर्भग्रह मुळ स्वरूपात असून या गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावरील ललाटबिंबावर गणेश आहे. द्वारशाखा ५ शाखी असून खाली शैव द्वारपान आहे. या गावातील ९० एकर क्षेत्रफळाच्या संजीवनी बेटामुळे हे गाव जिल्ह्यात प्रसिध्दीच्या झोतात आले आहे. या बेटावर ७० पेक्षा जास्त आयुर्वेदिक वनस्पती सापडल्या आहेत.

६) श्रीकृष्ण सत्यसाई धाम : चाकूर

महाराष्ट्रातील अल्पावधीत प्रसिध्द पावलेल्या व चाकूर येथील निसर्गरम्य व वनराईने नटलेल्या साई नंदनवनम् परिसरातील श्रीकृष्ण सत्यसाई धामात दि. १६ जुलै २००१ रोजी महंत श्री सत्यसाई बाबा यांच्या हस्ते येथील नवनिर्मित शिवालयासहित एकूण नऊ मंदिरातील ४० विविध देवदेवतांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना संपन्न झाली. श्री सत्यसाईबाबा यांच्यावरील श्रध्देचे प्रतिक म्हणून या साई नंदनवन परिसराचा तीर्थक्षेत्र म्हणून विकास होत आहे. हे स्थळ चाकूर - आनंदवाडी रस्त्यावर आहे. हे स्थळ लातूर जिल्ह्यातील एक महत्वपूर्ण व आकर्षक धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकसीत होत आहे.

७) सोमनाथ मंदिर : उदगीर

महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालयाच्या पुर्वेस काही अंतरावर असलेले उदगीर परिसरातील हे शिवमंदिर महत्वाचे सौंदर्य स्थळ आहे. शहराच्या पेठ वेशीतून या मंदिराकडे जाता येते. हे मंदिर कोणी आणि केव्हा बांधले याविषयी माहिती उपलब्ध नाही. परंतू बांधकाम ३०० ते ३५० वर्षापुर्वीचे असावे हे मंदिर त्रिगर्भी प्रकारातील आहे. गर्भगृहात शिवलिंग आहे. या मंदिरात चौकोनी तीर्थकुंड आहे. श्रावण महिन्यात या मंदिरात भाविक गर्दी करतात. या मंदिराच्या देखभालीसाठी पुर्वी जमीन देण्यात आली होती. त्यापासून ९०० रू. वार्षिक उत्पन्न येत होते.

८) वीरनाथ - मल्लिनाथ मंदिर : औसा

भागवत परंपरेतील लिंगायत - वीरशैव पंथियांचे हे मंदिर भुसार गल्लीमध्ये आहे. या मंदिराचा पाया वीरशैव महंत वीरनाथ यांनी घातला. महंत वीरनाथ महाराजानंतर त्यांचे सुपूत्र मल्लिनाथ महाराज यांनी या उत्कृष्ट व विलोभनीय कोरीवकाम असलेल्या दुमजली मंदिराचे काही बांधकाम पूर्ण केले. मल्लिनाथ महाराजांनी सुरूवातीच्या काळात औसा येथे नाथषष्ठीचा उत्सव साजरा केला. त्यावेळी औसास पंढरपूरचे स्वरूप प्राप्त होत असे. इतक्या मोठ्या प्रमाणावर येथे भाविकांची गर्दी होत असे मल्लिनाथ महाराजांनी बांधलेले हे भव्य व पुर्णतः कलाकुसरयुक्त मंदिर काळया स्फटिक दगडात बांधलेले आहे. येथे जेष्ठ शुध्द द्वादशीपासून सात दिवस यात्रा भरते. गुरूबाबाने येथून दरवर्षी आषाढी व कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला पालखी नेण्याचा पाडलेला प्रघात आजही चालू आहे.

९) भैरवनाथ मंदिर : चिंचोली बल्लाळनाथ

लातूर वायव्येस १८.४ कि.मी. अंतरावर वसलेल्या या गावात भैरवनाथचे प्राचीन मंदिर आहे. गर्भगृहात भैरवनाथाची काळया पाषाणातील एकसंघ मुर्ती असून बाजूस शिवलिंगही आहे. मंदिर प्राचीन असले तरी प्राचीन स्थापत्य शास्त्रीय वैशिष्ट्ये फारशी दिसत नाहीत. श्रावणातील प्रत्येक सोमवारी येथे भक्त गणांची गर्दी होते. चैत्र वैद्य आष्टमी व कार्तिकी वद्य आष्टमीला येथे जत्रा भरते.

१०) बुध्दविहार : लातूर

शहरात बोधेनगर येथे नव्याने एका बुध्दविहाराची निर्मिती करण्यात आलेली आहे. एका प्रशस्तजागी एक कृत्रिम टेकडी तयार करून त्यावर पद्मासनात ध्यानस्थ अवस्थेतील विशाल बुध्दमूर्ती साकरण्यात आलेली आहे. या मुर्तीची शांत व प्रसन्न मुद्रा दर्शकावर निश्चितच परिणाम करते. येथीील बुध्दविहारात प्रवेश केल्यावर एका गुहेत गेल्याचा भास होतो. या विहारात पहुडलेल्या अवस्थेत साधारणतः ५.४८ मी. लांबीची विशाल बुध्दमुर्ती आहे. हे शिल्प अजिंठा लेणीतील मुर्तीशिल्पाची आठवण करून देते. भव्यतेच्या दृष्टीने या मुर्तीचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. या बुध्दविहाराला बौध्द गार्डन या नावाने ओळखले जाते. लातूर जिल्ह्यातील हे आकर्षक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. महाराष्ट्राच्या अनेक प्रांतापासून लोक याठिकाणी वैशाखी पौर्णिमेला एकत्र येतात. लातूर व लातूरच्या आसपासच्या परिसरातून या ठिकाणी येणा-या पर्यटकांची संख्या वरचेवर वाढत आहे.

वरील धार्मिक स्थळांचा अभ्यास पर्यटनाच्या दृष्टीकोनातून करण्यात येणार आहे. हे पर्यटन जत्रा, यात्रा, सण, उत्सव, समारंभ इ. च्या माध्यमातून होत आहे. याचा परिणाम त्या त्या शहरातील गावातील अर्थव्यवस्थेवर होत आहे. त्याचप्रमाणे लातूरचे - केशवराज मंदिर, पापविनाश भूतेश्वर मंदिर, रत्नेश्वर मंदिर, जगदंबा माता मंदिर, श्री विराट हनुमान मंदिर, सुरत शहावलीचा दर्गा, पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर औसाचे - श्री केशव बालाजी मंदिर, रामलिंग मुगदडचे - रामलिंगेश्वर मंदिर, शिरूर अनंतपाळचे - अनंतपाळ मंदिर, किल्लारीचे - नीलकंठेश्वर मंदिर, तळीखेडचे - सोमेश्वर मंदिर, यांचाही अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण चौथे

धार्मिक पर्यटनाचा लातूर जिल्ह्यावर झालेला परिणाम

पर्यटनामुळे नैसर्गिक व मानवी वैशिष्ट्यांवर परिणाम होत असतात. विविध पर्यटनस्थळी त्या पर्यटन परिसरांतील निकटवर्ती ठिकाणी असलेल्या निसर्गावर तेथील मानवी समुहांच्या स्वभावात व संस्कृतीत दीर्घकालीन आणि दुरगामी परिणाम पर्यटकांच्या वागणुकीमुळे, त्यांच्या संस्कृतीमुळे, प्राप्त होणा-या पैशामुळे कळत नकळत घडून येत असतात. मानवाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक क्षेत्रावर पर्यटनाचा परिणाम होत असतो.

आर्थिक विकासावर झालेला परिणाम :

पर्यटन उद्योग हा कमी भांडवलात जास्त नफा मिळवून देणारा उद्योग आहे. लातूर जिल्ह्यात अनेक आकर्षक पर्यटनस्थळे असल्यामुळे अनेक पर्यटक या ठिकाणी येत आहेत. या पर्यटकांच्या येण्याने अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. आज सुशिक्षित बेकार तरूणांना पर्यटनामुळे कामाच्या नवीन संधी मिळत आहेत. ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारत आहे. परराष्ट्रातून ही पर्यटक लातूर जिल्ह्यत येतात. त्यामुळे जिल्ह्यास परकीय चलन उपलब्ध होत आहे. एखादा पर्यटक या स्थळांना भेट दिल्यानंतर तेथील अनेक वस्तु खरेदी करतात. त्यामुळे त्या त्या भागातील स्थानिक उद्योग विकसित होत आहेत. तसेच हस्तकलेचे उद्योग निर्माण झाले आहेत. पर्यटन व्यवसायातून अनेक प्रकारे महसूल प्राप्त होतो. अशा विविध प्रकारे लातूर जिल्ह्यातील विकासात पर्यटन आपली भूमिका पार पाडत आहे.

सामाजिक विकासावर झालेला परिणाम :

लातूर जिल्ह्यातील पर्यटनामुळे लोकांच्या जीवनपध्दती मध्ये परिवर्तन घडलेले दिसून येते. पर्यटनाच्या निमित्ताने आलेल्या लोकांच्या स्थानिक लोकांची जीवनपध्दती, संस्कृती यांच्याशी संबंध येतो. पर्यटन म्हणून आलेल्या लोकांवर याचा प्रभाव पडतो व त्यांच्या जीवनपध्दतीवर याचा परिणाम झालेला दिसून येतो. उदा. लातूरचे सैलानी बाबा तसेच चाँद पीरबाबा दर्गाह खाडगाव, लातूर हे मुस्लिम देवस्थान असले तरी हिंदू बोललेले नवस फेडण्यासाठी त्या उरूसामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. त्याचप्रमाणे लातूरमधील प्रसिध्द सिध्देश्वर यात्रेत सर्व धर्मातील लोक मोठ्या आनंदाने सहभागी होऊन एकात्मता व समानतेचे दर्शन घडवितात. अशा पध्दतीने धार्मिक पर्यटनाचा सामाजिक घटकावर परिणाम होत आहे. याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

सांस्कृतीक विकासावर झालेला परिणाम :

लातूर जिल्ह्यातील पर्यटनाचा आर्थिक व सामाजिक विकासाप्रमाणेच सांस्कृतीक विकासावर परिणाम झालेला दिसून येतो. लातूर जिल्ह्यात हिंदू, इस्लाम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, लिंगायत इ. धर्माचे लोक राहतात. त्यामुळे येथील लोकांवर एकमेकांच्या संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील पीर (चांडेश्वर) स्वामी समर्थ मंदिर, (लातूर) साई बाबा मंदिर

लातूर श्री केशव बालाजी मंदिर (औसा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक (पानगाव) त्यांच्या संस्कृतीचा स्थानिक लोकांशी संबंध आलेला आल्याने मुळच्या संस्कृतीवर परिणाम झालेला दिसून येतो याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

प्रस्तुत प्रकरणात प्रास्ताविक, पर्यटनाची ओळख, लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळ, लातूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळांचा झालेला परिणाम या सर्व प्रकरणांचा अभ्यास करतांना हाती आलेला निष्कर्ष मांडले जाणार आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. Bhatia A.K. : "Tourism Development Principals and Practice" Sterling Pubilsher Pvt. Ltd.

२. Kumar Akshay : "Tourism Management" Commonwealth Publisher New Delhi, 1997

३. Chief Editors : Dr. K.G. Pathan, Dr. V.S. Mangnale : Intellectual's Sandharbh Maharashtra

४. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर लातूर जिल्हा भाग - १ दार्शनिका महाराष्ट्र शासन, मुंबई

५. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर लातूर जिल्हा भाग - २ दार्शनिका महाराष्ट्र शासन, मुंबई

६. साखरे विजया - ''ऐतिहासिक पर्यटन'' अक्षरलेणं प्रकाशन, प्रथम आवृत्ती जुलै २०१२

७. दाण्डेकर गोपाल - ''महाराष्ट्र दर्शन'' मृण्मयी प्रकाशन, पुणे

८. अनिल कठारे, विजया साखरे - पुरातत्वाविद्या वस्तुसंग्रहालयशास्त्र, आणि पर्यटन विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद आवृत्ती २०११

९. महाराष्ट्रातील जिल्हे - के. सागर पब्लिकेशन

१०. डॉ. शिंदे एस.बी. - ''पर्यटन भूगोल'' फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती सप्टेंबर २०११

११. सांगळे शैलजा - ''पर्यटन भूगोल'' डायमंड पब्लिकेशन २००८

१२. डॉ. घारपुरे विठ्ठल - ''पर्यटन भूगोल'' मनोहर पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिकेशन पहिली आवृत्ती जून २००१

१३.	कुलकर्णी दत्ता - महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे

१४.	कुलकर्णी दत्ता - महाराष्ट्रातील धार्मिकस्थळे

१५.	सहस्त्रबुध्दे पु.ग. - "महाराष्ट्र संस्कृती" कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजय नगर, पुणे

१६.	प्रा. कुलकर्णी शिल्पा - "महाराष्ट्रातील पर्यटन" डायमंड पब्लिकेशन

१७.	शर्मा देवेश - धार्मिक पर्यटन मोहित बुक्स इन्टरनेशनल प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१०

१८.	साने र.य. - महाराष्ट्र पर्यटन कोश विद्या विकास मंडळ, नागपूर प्रथमावृत्ती

१९.	वि.स. सौताडेकर - लातूर काल आणि आज

२०.	इतिहास संशोधन मंडळ - लातूरचा इतिहास आणि रत्नापूर महात्म्ये

२१.	कुंटे मोरेश्वर - देवदर्शन जिल्हा लातूर मंदिरकोश प्रकाशन पुणे आवृत्ती २००१

२२.	प्रतापराव अहिरराव - महाराष्ट्रातील देव देवता डायमंड प्रकाशन पुणे २००९

२३.	जगमोहन नेगी - संपूर्ण भारत के पर्यटन तक्षशीला प्रकाशन आवृत्ती २००२

२४.	गुप्ता शिवसहाय - भारत के सांस्कृतिक एवं धार्मिक पर्यटन स्थळ मोहित बुक्स इन्टरनेशनल प्रकाशन, नई दिल्ली - २०१०

२५.	भारद्वाज डॉ. संजयकांत - भारत मे पर्यटन विकास हेमन्त पब्लिकेशन हाऊस प्रकाशन प्रथमसंकरण २०१३

२६.	डॉ. दुर्गा भागवत - महाराष्ट्र संस्कृती कोश, डायमंड प्रकाशन, पुणे

मार्गदर्शक
प्रा.डॉ. आर.एस.कांबळे
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला
महाविद्यालय, लातूर

संशोधक
आल्टे मनिषा रामा
मु.पो. मसला ता.जि.लातूर